# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०९/०३/२०१७

नक्षल आरोपी प्रा. साईबाबासह सहा आरोपी हे माओवादी संघटनेचे सक्रीय सदस्य आहेत असा न्यायनिर्णय मा. न्यायालयाने दिला आहे. केंद्र शासनाच्या २२/०६/२००९ च्या शासननिर्णयानुसार सी.पी.आय. माओवादी संघटना आणि त्यांच्या फ्रंटल ऑर्गनायझेशन या अतिरेकी संघटना असल्याचे घोषित करण्यात आलेले आहे. सी.पी.आय. माओवादी ही संघटना बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा कलम १५ अन्वये अतिरेकी कारवायांमध्ये गुंतलेली आहे. आरोपी हेम मिश्रा याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या मेमरीकार्ड मध्ये सन-२००९ मध्ये लाहेरी येथे झालेल्या चकमकीची व यामध्ये शहिद झालेल्या १७ जवानांची पुर्ण माहिती मिळून आली. तसेच मेमरीकार्ड मध्ये मिळून आलेल्या सर्व पत्रव्यहारांमधुन सी.पी.आय. माओवादी संघटना ही सर्व नक्षली सदस्यांना पोलीसांविरुध्द सशस्त्र संघर्ष करुन लढा देण्यासाठी प्रेरणा देत आहे अशी माहिती समोर आली आहे. यामुळेच गडचिरोली जिल्हयात ज्या घटना घडल्या आहेत त्याला सर्वस्वी जबाबदार माओवादी संघटना व फ्रंटल ऑर्गनायझेशन आहेत, असे निष्कर्ष न्यायालयाने नोंदविले आहेत.

प्रा. साईबाबा याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या हार्डडिस्कमध्ये सशस्त्र नक्षल्यांचे व्हिडीओ सापडले असून त्यात सी.पी.आय. माओवाद जिंदाबाद, लालसलाम जिंदाबाद अशा घोषणा देणारे नक्षल दिसून आले आहेत. तसेच त्यातील सापडलेल्या पत्रातील मजकुरात नक्षलबारी एकही रास्ता हे घोष वाक्य ठेवून जनसंघटनांच्या माध्यमातून देशभरातील १७ राज्यात सशस्त्र क्रांती करण्याबद्दल सी.पी.आय. माओवादी यांनी प्रेरणा दिल्याचे पुराव्यातून समोर आले आहे. या संघटनेमुळे प्रेरित होऊन केलेल्या हिंसेमुळे गडचिरोली जिल्हयाचे अतोनात नुकसान झाले असून ते कधीही भरुन न येण्यासारखे आहे. या गुन्हेगारांना जन्मठेप ही शिक्षासुध्दा कमी आहे. पण कायदयातील तरतुदी अन्वये जन्मठेप ही शिक्षा देण्यात येत आहे असा न्यायालयाचा निकाल आलेला आहे.

नक्षलवादयांनी गडचिरोली जिल्हा निर्मितीनंतर १९८२ पासून आत्तापर्यंत वेगवेगळया हिंसक घटना घडवून आणल्या. त्यामुळे जिल्हयाच्या विकासाची प्रगती खुंटली. जिल्हा निर्मितीच्या वेळी जशी परीस्थिती होती तशीच परीस्थिती आजही आहे. नक्षली कारवायांना पाठबळ दिल्यामुळे या कारवाया अजून जिल्हयात सुरु आहे.  सन १९८० ते आत्तापर्यंत नक्षलवादयांनी केलेल्या हिंसक कारवायांची सांख्यिकीक माहिती खालील प्रमाणे-

| अ. क्र | विवरण | संख्यात्मक विवरण |
|---|---|---|
| १ | सामान्य नागरिक मृत्यू | ४७४ |
| २ | सामान्य नागरिक जखमी | ३१२ |
| ३ | एसपीओ मृत्यू | २० |
| ४ | पोलीस शहिद | १९१ |
| ५ | पोलीस जखमी | ५११ |
| ६ | सरकारी मालमत्तेचे नुकसान | १०७,०३०,२९९ |
| ७ | खाजगी मालमत्तेचे नुकसान | १८५,००७,०१६ |

नक्षल आरोपी प्रा. साईबाबा प्रकरणात मा. न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासीक न्यायनिर्णयामुळे पांढरपेशा नक्षलींना आळा बसला आहे. जिल्हयात आत्तापर्यंत सामान्य नागरिकांना सोसावा लागलेला नक्षल्यांचा नाहक त्रास तसेच सामान्य नागरिक, पोलीस जवान यांना आपले गमवावे लागलेले प्राण या सर्वांचा विचार करून मा. न्यायालयाने प्रा. साईबाबा व इतर पाच आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. यामुळे सामान्य नागरिक नक्कीच सुखावला आहे.